# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

उच्चश्रेणी/निम्नश्रेणी लघुलेखक (सेवानिवृत्त) यांची सेवा करार पध्दतीने
विवक्षित कामासाठी घेणेबाबत..

## संक्षिप्त जाहिरात

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार, राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील विवक्षित कामाकरिता (श्रुतलेखन व टंकलेखन) सेवानिवृत्त लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरिता पात्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. संबंधित अर्जदारांनी दिनांक **२०/०८/२०२४** रोजी सायंकाळी **५:००** वाजेपर्यंत लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्र सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२ **येथे प्राप्त होतील अशा बेताने समक्ष किंवा टपालाने सादर करावेत. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीने करण्यात येईल.**

**अर्जाचा नमूना, सविस्तर जाहिरात व अटी/शर्ती पी.डी.एफ. स्वरूपात** https://mahasec.maharashtra.gov.in **या आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

सही/-
सुरेश काकाणी
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

डीजीआयपीआर/२०२४-२५/क्र......./.......

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

पहिला मजला,नवीन प्रशासकीय भवन,हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड,मुंबई - ४०० ०३२

## उच्चश्रेणी/निम्नश्रेणी लघुलेखक (सेवानिवृत्त) यांची विवक्षीत कामांसाठी करार पध्दतीने नेमणूक करण्याबाबत जाहिरात

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३,दिनांक १७/१२/२०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) या संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची करार पध्दतीने राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात विवक्षीत कामासाठी (श्रृतलेखन व टंकलेखन) नेमणूक करावयाची आहे.

| क्र | संवर्ग | पदसंख्या | वय , अर्हता व अनुभव | करार सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय सेवेतून उच्चश्रेणी/निम्नश्रेणी लघुलेखक (गट ब-अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी | ०२ | **६३ वर्षांपेक्षा जास्त नसावे.**<br><br>लघुलेखक पदावर तीन वर्षाचा अनुभव. | एक वर्षाच्या कालावधीकरिता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता |

महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील विभागातून किंवा संविधानिक संस्थेत मराठी/इंग्रजी लघुलेखनासह टंकलेखनाचे कामकाज केलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची करार पध्दतीने वरील कालावधीकरिता नेमणूक करावयाची आहे. या पदाकरीता इच्छुक सेवानिवृत्त कर्मचारी यांना मराठी/इंग्रजी श्रृतलेखनाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे दि. २०/०८/२०२४ रोजी सायंकाळी **५:००** वाजेपर्यंत प्राप्त होईल याप्रमाणे **टपालाव्दारे किंवा प्रत्यक्ष** सादर करावीत. अर्जाच्या **पाकीटावर "उच्चश्रेणी/निम्नश्रेणी लघुलेखक(सेवानिवृत्त) यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे.** उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याबाबतच्या सविस्तर अटी/शर्ती व अर्जाचा नमुना राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर https://mahasec.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

सही
सुरेश काकाणी
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# उच्चश्रेणी/निम्नश्रेणी लघुलेखक (सेवानिवृत्त) नेमणूक :- सर्वसाधारण अटी व शर्ती

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याने ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूका ह्या एक वर्षाच्या कालावधीकरिता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त पात्र अर्जदाराला, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३,दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे, तसेच **सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.०८.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमीक अनुज्ञेय असेल. त्यानुसार संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्याला करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्तीवेतन ( अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता ) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.**

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील.

५. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचे, स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास त्यांना नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील. यासोबतच विहित अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र देणे आवश्यक राहील.

७. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रलंबित नसावे. याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेली नसावी. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१०. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

११. करार पध्दतीवरील व्यक्तीने त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१२. करार पध्दतीवरील नियुक्त व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीस नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१३. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे किंवा अटी/शर्ती मध्ये सवलत देण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार जाहीरातीतील नमूद केलेली पदे कमी/अधिक होऊ शकतील.

सही
सुरेश काकाणी
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

विहित नमुन्यातील अर्ज

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात विवक्षीत कामासाठी सेवानिवृत्त लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज.

प्रति,
मा. सचिव
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र,
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

अर्ज केलेल्या पदाचे नाव --------------------------------

१. अर्जदाराचे नाव -
२. कायमचा पत्ता -
३. दूरध्वनी क्रमांक -
/भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) -
४. ई-मेल (अनिवार्य) -
५. सध्याचा पत्ता -
६. जन्मतारीख -
७. राष्ट्रीयत्व -
८. सेवानिवृत्तीचे पद -
९. लिंग -
१०. अवगत भाषा -
११. शैक्षणिक माहिती - पदवी/पदविका/इतर.
१२. अनुभव

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

१३. सेवानिवृत्तीचा दिनांक -
१४. सेवानिवृत्त ज्या कार्यालयातून झाले त्या कार्यालयाचे नाव -
१५. सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल -

( वर नमूद तपशिलाबाबत आवश्यक ते पुरावे स्वसाक्षांकित करून अर्जासोबत जोडावे.)

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

**कृ.मा.प.**

# प्रतिज्ञापत्र

मी, ---------------------------------- प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे वाचन केले असून ते मला पूर्णपणे मान्य आहे.

ठिकाण:-                                                                 स्वाक्षरी

दिनांक :-